सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### भाजपा जालना महानगर ची जिल्हा कार्यकारिणी बैठक संपन्न

## पक्षशिस्त आणि संघटन बळकटीसाठी एकजुटीने काम करा - रावसाहेब दानवे

### प्रत्येक बूथ सक्षम करा, सेवा संकल्प अभियान यशस्वी करा - भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक आज दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी कलश सीड्स, जालना येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. यावेळी भाजप नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर, आ. नारायणजी कुचे, आ. सुहास शिरसाठ, माजी आमदार कैलासजी गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या प्रारंभी दीपप्रज्वलन, पूर्ण वंदे मातरम्, महाराष्ट्र गीत व बैठक गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर बैठकीत विविध संघटनात्मक व सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा करून




आगामी काळातील कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना भाजप नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना पक्षशिस्तीचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले की, पक्षासाठी काम करताना पद, संख्या किंवा वैयक्तिक मतभेद यापेक्षा पक्षाची शिस्त आणि संघटनात्मक बांधिलकी अधिक महत्त्वाची आहे. आपापसातील मतभेद बाजूला ठेवून पक्षहिताला प्राधान्य देत सर्वांनी एकजुटीने काम केले पाहिजे. प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने आपली जबाबदारी ओळखून केवळ पदापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जनतेमध्ये जाऊन काम करावे. बूथपासून महानगरापर्यंत संघटना अधिक सक्षम करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असून, पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. संघटनेत काम करताना व्यक्तिगत मतभेद किंवा नाराजीला स्थान न देता पक्षाच्या ध्येय-धोरणांना केंद्रस्थानी ठेवून काम केल्यास संघटना अधिक मजबूत होईल, असे दानवे यांनी स्पष्ट केले.माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर दिला. ते म्हणाले की, सरकारच्या योजनाचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केवळ राजकीय कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता सातत्याने जनतेच्या संपर्कात राहावे, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि शासनाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी. केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची आणि जनहिताच्या निर्णयांची माहिती प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी स्वीकारावी. जनतेशी सातत्याने संवाद ठेवून सरकारचे काम लोकांपर्यंत पोहोचवावे तसेच नागरिकांच्या प्रश्नांवर प्रशासनाकडे पाठपुरावा करावा, असे ही लोणीकर यांनी सांगितले. आ.नारायणजी (पान २ वर)

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; केंद्र व राज्य सरकारकडून निश्चित मदत मिळवून देणार - आमदार बबनराव लोणीकर

**पांगरी गोसावी येथे उडीद पिकाचे गुंठ्याला केवळ ३७० ग्रॅम उत्पादन, आमदार बबनराव लोणीकर यांच्यासमोर माता-भगिनींनी मांडली पाणीटंचाईची व्यथा**

**जालना - प्रतिनिधी**

जालना व मंठा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी पांगरी गोसावी, नियर सेवली, शिवनगिरी, जयपूर, खोराड, सावंगी, माळतोंडी व गेवराई या गावांचा दुष्काळ पाहणी दौरा केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांची पाहणी केली, शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधला आणि



दुष्काळामुळे निर्माण झालेल्या अडचणी जाणून घेतल्या. पांगरी गोसावी येथे उडीद व मूग पिकाचा पीक कापणी प्रयोग करण्यात आला. एका गुंठ्यामध्ये केवळ ३७० ग्रॅम उडीद उत्पादन झाल्याचे समोर आले. अत्यल्प उत्पादनामुळे शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाचे गांभीर्य स्पष्ट झाले असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे आवश्यक असल्याचे आमदार लोणीकर यांनी नमूद केले.

दुष्काळ पाहणी दौऱ्यादरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. सोयाबीनच्या शेतामध्ये शेतकरी बांधवांसोबत जमिनीवर बसून केळीच्या पानावर ज्वारीची भाकर, मुगाची भाकर, पिठलं, ठेचा आणि लोणचं असा साधा शेतकरी भोजनाचा आस्वाद घेतला. कुठलाही बडेजाव अथवा तामझाम न करता शेतकऱ्यांसोबत जेवण करत त्यांनी आपले शेतकरी कुटुंबाशी असलेले नाते अधोरेखित केले. "मी आमदार असलो तरी सर्वात अगोदर शेतकऱ्याचा मुलगा आहे. मला शेतीमधील काम कळते. शेतकऱ्याचे दुःख आणि त्याची वेदना मला माहीत (पान २ वर)

## लक्कडकोट हत्या प्रकरण; प्रॉपर्टी विक्रीच्या रकमेवरून वाद झाल्याची प्राथमिक माहिती

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील लक्कडकोट परिसरात शनिवारी रात्री कौटुंबिक वादातून घडलेल्या हत्येच्या घटनेने परिसर हादरला आहे. आफरीन नईमोद्दीन काझी (वय ३८) यांचा गंभीर हल्ल्यात मृत्यू झाला. पत्नीची हत्या केल्यानंतर पती नईमोद्दीन काझी स्वतःहून सदर बाजार पोलीस ठाण्यात हजर झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून, या हत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी आफरीन आणि नईमोद्दीन या दाम्पत्याच्या मालकीची काही प्रॉपर्टी विक्री करण्यात आली होती. या व्यवहारापोटी नोटरीद्वारे त्यांना काही रक्कम टोकन स्वरूपात मिळाली होती. ही रक्कम घेऊन दोघे घरी आल्यानंतर पैशाच्या कारणावरून त्यांच्यात वाद सुरू झाल्याची माहिती आहे. शनिवारी (पान २ वर)

## विघ्नहर्ता गणेश मंडळाकडून दिव्यांग व अनाथ बालकांना अन्नदान, शैक्षणिक साहित्याचे वाटप

### गणेशोत्सवातून सामाजिक बांधिलकीचा संदेश; गरजू बालकांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**जालना । प्रतिनिधी**

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव ठरावा, या उद्देशाने विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने दिव्यांग व अनाथ बालकांसाठी अन्नदान तसेच शैक्षणिक साहित्य वाटपाचा सेवाभावी उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून गरजू बालकांना मदतीचा हात देत मंडळाने सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश दिला. या उपक्रमास अपर



पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम माळी तसेच अभिमन्यू खोतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीत दिव्यांग व अनाथ बालकांना अन्नदान करण्यात आले. तसेच त्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गणेशोत्सवाच्या उत्साहाला सामाजिक सेवेची जोड देत मंडळाने राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. गरजू बालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि त्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे, हीच गणरायाच्या चरणी खरी सेवा असल्याची (पान २ वर)

## श्रीमद भागवत कथा श्रवणाने मृत्यूचे भय नाहीसे होते-स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज

### भव्य शोभायात्रेने जालन्यात भागवत ज्ञानयज्ञाला प्रारंभ

**जालना - प्रतिनिधी**

मानवी जीवनातील सर्वात मोठे सत्य म्हणजे मृत्यू, परंतु या नश्वर देहाचा अंत होताना प्रत्येकाच्या मनात मृत्यूचे भय निर्माण होते. या भयावर मात करून आत्मिक मुक्ती मिळवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे श्रीमद्भागवत कथेचे एकाग्र चित्ताने श्रवण करणे होय. जो व्यक्ती भागवताचे मनोभावे श्रवण करतो, त्याला काळ किंवा मृत्यूची भीती उरत नाही, हाच संदेश या कथेमधून मिळतो. ज्याप्रमाणे राजा परीक्षिताने पवित्र प्रौष्ठपदी पर्वामध्ये भागवत कथेचे श्रवण करून मोक्षाची प्राप्ती



केली, त्याच पर्वात कथा श्रवण आणि चिंतन करण्याची संधी जालनेकरांना मिळाली ही परमात्म्याची कृपाच आहे, असे निरूपण श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष तथा श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास, मथुराचे उपाध्यक्ष प.पू. राष्ट्रीय संत गुरुदेव स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी येथे केले.₹

भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने आयोजित आयोजित श्रीमद् भागवत कथेला

रविवार दि.२० सप्टेंबर रोजी मंठा रोडवरील आईसाहेब लॉन्स येथे भव्य शोभायात्राने सुरुवात झाली, त्याप्रसंगी स्वामी गोविंददेवगिरीजी निरूपण करत होते.शोभायात्रेनंतर कथेचे मुख्य यजमान विष्णूकुमार चेचानी, आजचे दैनिक यजमान घनश्याम गोयल आणि प्रसाद यजमान रवीकुमार झंवर यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. मंत्रोच्चार, शंखनाद आणि मंगलमय वातावरणात झालेल्या या महापूजेनंतर राष्ट्रीय संत स्वामी (पान २ वर)

## परतूर शहरात विकासकामांचा धडाका

### आ. बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून शहरातील १ कोटी १५ लक्ष रुपये किमतीच्या, अंतर्गत रस्ते, नाल्या व लिंगायत समाजाच्या स्मशानभूमी बांधकामाचे भूमिपूजन

**परतूर - प्रतिनिधी**

आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून परतूर नगरपालिकेला उपलब्ध झालेल्या विकासनिधीतून शहरातील विविध विकासकामांना मोठ्या प्रमाणात गती मिळाली असून, शहरातील तब्बल १ कोटी १५ लक्ष रुपये किमतीच्या शहरांतर्गत सिमेंट रस्ते नाली बांधकाम तसेच लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीचे भूमिपूजन जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजनाच्या निमित्ताने बोलताना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल




लोणीकर यांनी परतूर शहराच्या विकासाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, परतूर शहरातील नागरिकांना दर्जेदार आणि कायमस्वरूपी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आमदार बबनराव लोणीकर यांचे प्राधान्य आहे. शहरातील प्रत्येक रस्ता टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीटमध्ये बांधण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, विकासकामांच्या माध्यमातून परतूर शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा संकल्प आहे.

शहरातील विविध भागांमध्ये सिमेंट काँक्रीटचे रस्ते झाल्यामुळे नागरिकांची वाहतूक अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. पावसाळ्यात रस्त्यांची होणारी दुरवस्था, चिखल आणि वाहतुकीच्या अडचणी यावरही कायमस्वरूपी उपाय करण्याच्या दृष्टीने ही कामे अतिशय महत्वाची असल्याचे या वेळी राहुल लोणीकर यांनी नमूद केले

शहरातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विकासकामांना प्राधान्य देण्यात येत असल्याचेही यावेळी राहुल लोणीकर यांनी सांगितले.

शहराच्या सौंदर्यात भर घालणारे उद्यान लवकरच नागरिकांसाठी उपलब्ध व्हावे या साठी आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते नमो उद्यानाचे भूमिपूजन संपन्न होणार असल्याचे यावेळी त्यांनी बोलताना सांगितले

पुढे बोलताना ते म्हणाले की, परतूर शहरांमध्ये या उद्यानाच्या (पान २ वर)

## व्यसनमुक्त युवा हीच विकसित भारताची ताकद - विनोद जैतमहाल

**जालना - प्रतिनिधी**

व्यसनांमुळे व्यक्तीचे शरीर सडत जाते, त्यामुळे कुणी कितीही आग्रह केला तरी युवकांनी व्यसनांपासून दूर रहावे, कारण व्यसनमुक्त युवा हीच विकसित भारताची ताकद आहे, असे प्रतिपादन अभिनेते, कवी, लेखक विनोद जैतमहाल यांनी केले.

माय भारत, जालना, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व वसंतराव नाईक नर्सिंग महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' करण्यात आले. या सदरील कार्यक्रमाचे आयोजन वसंतराव नाईक नर्सिंग महाविद्यालय येथे करण्यात आले. युवकांमध्ये



व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करून निरोगी व सक्षम समाजाच्या निर्मितीचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन मयूरकुमार गोरमे, जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, जालना यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉन गिलिट्स, तसेच नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा संघटक बी. एस. सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी 'नशामुक्त भारत' घडवण्याची सामूहिक शपथ घेऊन केली. यावेळी प्राचार्य डॉ. जॉन गिलिट्स आणि विनोद जैतमहाल यांनी (पान २ वर)

# संपादकीय...

## आरक्षणाच्या लढ्याला व्यक्तीविरोधी संघर्षाचे वळण नको!

मराठा आरक्षणाचा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वाधिक संवेदनशील आणि दीर्घकाळ प्रलंबित विषय आहे. या प्रश्नासाठी हजारो तरुण रस्त्यावर उतरले, लाखो समाजबांधवांनी मोर्चे काढले, उपोषणे झाली आणि अनेकांनी संघर्षाची किंमत मोजली. त्यामुळे आज या आंदोलनाकडे केवळ कोण कोणाच्या विरोधात आहे, या राजकीय चष्म्यातून पाहणे हा मूळ प्रश्नाला दुय्यम ठरविण्याचा धोका आहे. जालन्यात शिवसेना उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर यांनी पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्यांना विरोध करत शिंदे सरकारच्या काळात मराठा आरक्षणासाठी झालेल्या निर्णयांचा दाखला दिला. हा मुद्दा केवळ शिंदे विरुद्ध जरांगे असा करून संपवणे सोपे आहे; पण मराठा समाजाच्या भवितव्याच्या दृष्टीने ते पुरेसे नाही. मुळात प्रश्न असा आहेमराठा आरक्षणासाठी सरकारने आतापर्यंत काय केले आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती झाली? हा प्रश्न कोणत्याही नेत्याला अपमानित करण्यासाठी नाही, तर सरकारला जबाबदार धरण्यासाठी विचारला पाहिजे. १७ सप्टेंबर रोजी जरांगे-पाटील यांनी सरकारसोबतच्या चर्चेनंतर ९० दिवसांसाठी उपोषण स्थगित केले. हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्रांसाठी सुधारित जीआर, शिंदे समितीच्या ५८ लाख नोंदी कमी न करणे आणि काही अन्य मागण्यांवर सरकारकडून आश्वासने देण्यात आल्याचे वृत्त आहे. म्हणजेच आता आंदोलन आणि सरकार दोन्ही एका निर्णायक टप्प्यावर आहेत. ९० दिवस हा केवळ कालावधी नाही; तो सरकारच्या प्रशासनिक इच्छाशक्तीची परीक्षा आहे. दुसरीकडे आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांनाही आत्मपरीक्षण करावे लागेल. सरकारवर टीका करणे, प्रश्न विचारणे, आंदोलन करणे हा लोकशाहीतील अधिकार आहे. परंतु व्यक्तीविषयीची भाषा जर प्रश्नाच्या गांभीर्यावर मात करू लागली, तर आंदोलनाची नैतिक ताकद कमी होण्याचा धोका असतो. एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करायची असेल तर त्यांच्या निर्णयांवर करा. त्यांनी घेतलेल्या निर्णयांचे परिणाम तपासा. कुणबी प्रमाणपत्र प्रक्रियेत किती पात्र व्यक्तींना लाभ मिळाला, किती प्रकरणे प्रलंबित आहेत, जातवैधता किती प्रकरणांत मिळाली, हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीतील अडथळे कोणते आहेतहे प्रश्न विचारा. आणि सरकारलाही एकच प्रश्नकागदावरील आश्वासन प्रत्यक्ष प्रमाणपत्रात कधी उतरवणार? मराठा आरक्षणाचा प्रश्न भावनेचा आहेच; पण त्याहून अधिक तो कायदा, प्रशासन, पुरावे आणि घटनात्मक चौकटीचा प्रश्न आहे. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनीही आपल्या मागण्यांची कायदेशीर अंमलबजावणी कशी होईल, यावर तितकाच भर दिला पाहिजे. राजकीय श्रेयासाठी एकमेकांचे योगदान नाकारणे हा देखील या प्रश्नाचा मार्ग नाही.

शिंदे सरकारच्या काळात न्या. संदीप शिंदे समितीच्या माध्यमातून जुन्या अभिलेखांतील नोंदी शोधण्याची प्रक्रिया पुढे गेली, हा एक दस्तऐवजीकृत प्रशासकीय टप्पा आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र मराठा आरक्षणाचा कायदेशीर मार्गही २०२४ मध्ये पुढे नेण्यात आला. मात्र कोणताही कायदा किंवा शासन निर्णय म्हणजे अंतिम आणि निर्विवाद आरक्षण मिळाले, असा अर्थ काढता येत नाही. त्याची अंमलबजावणी, न्यायालयीन स्थिती आणि प्रत्यक्ष लाभार्थी हे स्वतंत्रपणे तपासावे लागतात. म्हणूनच 'श्रेय कुणाचे?' पेक्षा 'लाभ कुणाला आणि कधी?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. आज मराठा समाजासमोर दोन टोकांची भाषा उभी राहते आहेएका बाजूला व्यक्तीपूजा आणि दुसऱ्या बाजूला व्यक्तीविरोध. या दोन्हींपेक्षा तिसरा मार्ग आवश्यक आहे : दस्तऐवज, कायदा आणि परिणामांचा मार्ग. एकनाथ शिंदे यांचे समर्थक म्हणत असतील की त्यांनी मराठा समाजासाठी महत्त्वाचे निर्णय घेतलेतर त्याची कागदपत्रे समाजासमोर ठेवावीत. आंदोलनकर्ते म्हणत असतील की सरकारने मागण्या पूर्ण केलेल्या नाहीततर कोणती मागणी, कोणता निर्णय आणि कोणती अंमलबजावणी बाकी आहे, याचा स्पष्ट हिशेब द्यावा. हीच खरी विधायक चर्चा. आणि सर्वांत महत्त्वाचेमराठा आरक्षणाचा प्रश्न हा कोणत्याही एका नेत्याचा वैयक्तिक प्रश्न नाही. तो लाखो कुटुंबांच्या शिक्षणाचा, रोजगाराचा आणि भविष्यातील संधींचा प्रश्न आहे.

त्यामुळे आंदोलनाला राजकीय रंग येऊ नये, असे म्हणणे जितके अपुरे आहे, तितकेच राजकीय संघर्षालाच आंदोलनाचे अंतिम रूप देणेही धोकादायक आहे. नेते बदलतील, पक्ष बदलतील, सत्तेची समीकरणे बदलतील; पण मराठा तरुणाच्या हातातील संधीचा प्रश्न कायम राहणार आहे.

म्हणून आज गरज आहे ती घोषणा वाढविण्याची नाही, तर हिशेब मागण्याची.

हैदराबाद गॅझेटचा मार्ग काय?

कुणबी प्रमाणपत्रासाठी पात्रतेचे निकष काय?

जातवैधतेची प्रक्रिया किती वेळात पूर्ण होणार?

शिंदे समितीच्या नोंदींचे पुढे काय?

सरकारने दिलेली ९० दिवसांची आश्वासने कोणत्या शासन निर्णयांत उतरतील? आणि सर्वांत महत्त्वाचेमराठा तरुणाला प्रत्यक्ष लाभ कधी मिळणार? या प्रश्नांची उत्तरे मिळाली तर आंदोलनाला दिशा मिळेल. अन्यथा व्यक्ती विरुद्ध व्यक्ती, समर्थक विरुद्ध विरोधक आणि ट्रोल विरुद्ध ट्रोल अशा संघर्षात मूळ प्रश्न पुन्हा एकदा राजकीय धुरात हरवेल. मराठा समाजाला आता संघर्षाची भाषा नको असे नाही; पण त्या संघर्षाला दिशा, कायदेशीर आधार आणि अंतिम परिणाम हवा आहे. कारण मराठा आरक्षणाचा खरा विजय कोणाच्या पराभवात नाही; तो पात्र तरुणाच्या हातात मिळणाऱ्या न्यायात आहे.

# आदर्श शिक्षक कसा असावा?

लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील संगय्या स्वामी डी.एड. महाविद्यालयाच्या २००४-०५ या पहिल्या शैक्षणिक वर्षातील पहिल्या बॅचचा हा आठवणींचा ठेवा... 'शिक्षक कसा असावा?' हा प्रश्न तत्कालीन प्राचार्य श्री. विश्वनाथ काळे सर यांनी डी.एड. प्रशिक्षणार्थींसमोर ठेवला होता. त्यावेळी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख तथा डी.एड. प्रशिक्षणार्थी गंगाधर वानोळे यांनी या प्रश्नावर आपले विचार मांडले होते.सन २००५ मध्ये मांडलेले हे विचार तब्बल २१ वर्षांनंतरही शिक्षकाचे कर्तव्य, त्याची मूल्यनिष्ठा, विद्यार्थ्यांप्रती असलेली जबाबदारी आणि समाजाप्रती असलेले योगदान यांचा विचार करताना आजही तितकेच उपयुक्त आणि मार्गदर्शक वाटतात.काळ बदलला, शिक्षणपद्धती बदलली, तंत्रज्ञानाने शिक्षणक्षेत्रात मोठी झेप घेतली; मात्र आदर्श शिक्षकाची मूल्ये, कर्तव्यनिष्ठा, विद्यार्थ्यांवरील प्रेम आणि ज्ञानदानाची भूमिका आजही तितकीच महत्त्वाची आहे.त्यामुळे २१ वर्षांपूर्वी एका डी.एड. प्रशिक्षणार्थीने मांडलेले 'आदर्श शिक्षक कसा असावा?' यावरील हे विचार आजच्या शिक्षक, शिक्षणप्रेमी आणि वाचकांसाठी प्रकाशित करीत आहोत.

आदर्श शिक्षक म्हटले की ते आठवतात महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि साने गुरुजी. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा गुरु असतो. म्हणून म्हणतात,

''गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु
गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म
तस्मै श्री गुरवे नमः ।।''

गुरु म्हणजे दिशा दाखवणारा. जसे की, मातीपासून मडके घडवणारा कुंभार हा मातीला आकार देऊन माठ बनवत असतो. त्याचप्रमाणे शिक्षकाला मुलांना आदर्श विद्यार्थी घडवायचा असतो. म्हणून शिक्षक हा एक प्रकारचा कुंभारच असतो. म्हणून शिक्षक हा अगोदरच आदर्श असायला हवा. शिक्षक आदर्श असायलाच हवा म्हणजे त्याचे विचार आदर्श असायला हवेत.

प्रत्येक शिक्षकांनी वेळेचे भान ठेवले पाहिजे. वेळेनुसार सर्व कामे पार पाडली पाहिजेत. वेळ ही एखाद्या वाहणाऱ्या नदीसारखी असते. एखादी नदी पुढे गेल्याने ती कधीही मागे वळून पाहत नाही. म्हणून शिक्षकांनी वेळेचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. शिक्षकांनी चांगले गुण आत्मसात करून घेण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न न करताच खचून जाणारा शिक्षक नसावा.

शिक्षकांनी आपण शिक्षकच आहोत म्हणून जमणार नाही, तर विद्यार्थ्याप्रमाणे जास्तीत जास्त ज्ञानार्जन करावे. जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनातील शेवटच्या क्षणापर्यंत दिवसातील २४ तासांपैकी १८ तास ज्ञानार्जनासाठी देत होते.

केवळ ज्ञान संपादन करून चालणार नाही, तर त्याचा समाजात उपयोग करून दिला पाहिजे. यातूनच आदर्श शिक्षक बनतात. शिक्षकांनी भेदभाव करू नये. यावर साने गुरुजी म्हणतात,

''प्रभूची लेकरे सारी । जयाला सर्वही प्यारी ।
कुणाला तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे ।।''

शिक्षकांनीसुद्धा साने गुरुजींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सर्वांना सन्मान व न्याय दिला पाहिजे. भेदभाव करता कामा नये. शिक्षकांनी आपल्या कर्तव्याची जाणीव नेहमी ठेवायला पाहिजे. कर्तव्याची जाण नसेल तर तो शिक्षक ठरू शकत नाही. शिक्षकांनी नेहमी स्वच्छ आणि निर्मळ राहायला शिकले पाहिजे. फक्त बाह्य निर्मळ असून चालणार नाही, तर अंतर्मन स्वच्छ आणि सुंदर असायला हवे. शिक्षकांची वर्तणूक अतिशय चांगली असायला हवी, कारण समाजात वर्तणुकीवरून व्यक्तीची प्रतिष्ठा वाढत असते. शिक्षकी पेशाला डाग पडेल अशी वर्तणूक शिक्षकांनी करू नये.

शिक्षक नेहमी प्रसन्न आणि उत्साही असायला हवा. कारण प्रसन्न आणि उत्साही शिक्षकच विद्यार्थ्यांना चांगले शिकवू शकतात. नाहीतर शिक्षकच खिन्न, निराश असतील तर विद्यार्थी आळशी होण्याची शक्यता असते. तसेच शिक्षकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व असणे आवश्यक आहे. समाजात एक वेगळेच स्थान असणे आवश्यक आहे. शिक्षकांनीही सत्याने चालणारे असावे. शिक्षकांनी नेहमी खरे तर बोलावेच, पण दुसऱ्यांना खरे बोलायला सांगावे.

शिक्षक हा दया करणारा, मायाळू असावा. माणूस हा चुकीचा पुतळा असतो. विद्यार्थ्यांकडून चुका होणे साहजिकच आहे. ती चूक जर आपण शिक्षा देऊन निभावायची असेल, तर ती चूक लवकर सुधारणार नाही; पण आपण मायेने समजावून सांगितली, तर त्याच्यात लवकर सुधारणा होईल. उलट त्याच्यावर शिक्षा केली, तर त्याचे विचार खुंटण्याची शक्यता असते. म्हणून शिक्षक हा दयाळू असावा. बदलत चाललेल्या विद्यार्थ्यांशी, बदलत चाललेल्या काळाशी निगडित असे वातावरण शिक्षकाने तयार करायला पाहिजे. विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता लक्षात घेऊन त्यांना शिकवले पाहिजे. शिक्षक म्हणून काम पाहत असताना आपल्याकडे कोणतीही तक्रार येऊ नये, याची खात्री शिक्षकांनी करून घेतली पाहिजे. समाजात वावरत असताना आपल्याकडे लोकांनी शिक्षक या भावनेने पाहिले पाहिजे, अशी वागणूक शिक्षकांनी ठेवायला पाहिजे.



शिक्षकाने नेहमी जास्तीत जास्त ज्ञान संपादन करून विद्यार्थ्यांना सांगावे, कारण ज्ञान दिल्याने वाढते आणि न देता जपून ठेवल्याने त्याचा लोप होतो. ''ज्ञानदान सर्वश्रेष्ठ दान.'' दान तर प्रत्येक माणूस करतच असतो; पण ज्ञानदान करणे महत्त्वाचे आहे, कारण सर्व दानांमध्ये सर्वश्रेष्ठ दान म्हणजे ज्ञानदान होय. म्हणून ज्ञानदानाचे सर्व श्रेय शिक्षकालाच जाते. याचे भाग्य फक्त शिक्षकालाच लाभते, इतर कोणालाही लाभत नाही.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून द्यावी आणि विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न करावा. जर प्रत्येक शिक्षकांनी असा संकल्प केला, तर भारत देश हा खरोखरच सुजलाम् सुफलाम् झाल्याशिवाय राहणार नाही.

सर्व देश भारताकडे आदर्श देश म्हणून पाहतील. हे सर्व आदर्श शिक्षकच करू शकतात. ही विद्यार्थ्यांच्या आधारावर आणि आपण असा विचार केला, तर विद्या नसती तर....

''विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले;
वित्ताविना शूद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले.''

पहा, किती भाग्य लाभले आहे आपल्याला. याचा पुरेपूर वापर करून घेणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षकांनी जास्तीत जास्त प्रयत्न करायला हवेत. हे सर्व शिक्षकच करू शकतात. आदर्श शिक्षकांनी नेहमी आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे. ज्ञानाचा पुरेपूर वापर करून सांगितले पाहिजे. या सर्व समाजाला बदलण्याचे काम फक्त निधीचा आधार घेऊन शिक्षकच करू शकतात. म्हणून शिक्षक हा नावापुरता शिक्षक नसून तो एक आदर्श शिक्षक असावा.

**श्री गंगाधर वानोळे**
**सहशिक्षक,जि.प.प्रा.शाळा,पाटोदा**

पान १ वरुन...

### पक्षशिस्त आणि...

कुचे यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय ठराव मांडण्यात आला. पक्षाच्या संघटनात्मक वाटचालीसह आगामी कार्यक्रमांमध्ये पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रभावी सहभाग नोंदवावा, यावर बैठकीत भर देण्यात आला. माजी आमदार कैलासजी गोरंटयाल यांनी ... संदर्भातील आढावा व पुढील नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. संबंधित कामकाजात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासोबतच आगामी काळातील विविध संघटनात्मक व सामाजिक उपक्रमांचे नियोजन प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. बूथस्तरापासून महानगरापर्यंत संघटना अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने आपल्या जबाबदारीच्या क्षेत्रात नियमित संपर्क ठेवून सक्रियपणे काम करणे आवश्यक आहे, यावेळी त्यांनी 'सेवा संकल्प अभियान प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन करत सांगितले की, देशाचे आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या जनसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत जालना महानगरातील प्रत्येक मंडल, प्रभाग, बूथ आणि घरापर्यंत हे अभियान पोहोचविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. अभियानात नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविणे, जनतेशी संवाद साधणे आणि सेवा व विकासाचा संदेश घराघरापर्यंत पोहोचविणे यावर भर देण्यात यावा, असे हि त्यांनी सांगितले. यावेळी सर्व नगरसेवक, भाजपा जालना महानगर जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य, मंडल पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप भाजप नेते रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाने झाला, तर आभार प्रदर्शन महेश निकम यांनी केले.

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना...

आहे,'' असे त्यांनी सांगितले. पाच वेळा आमदार आणि एक वेळा राज्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून जबाबदारी पार पाडताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दौऱ्यादरम्यान परिसरातील माता-भगिनींनी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासमोर पाणीटंचाईच्या गंभीर समस्या मांडल्या. कुटुंबासाठी पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता आणि शेतीसाठी आवश्यक पाण्याचा अभाव यामुळे ग्रामीण भागातील जनजीवन मोठ्या अडचणीत सापडले असल्याचे त्यांनी सांगितले. पाण्याअभावी दैनंदिन कामकाजावर होणारा परिणाम तसेच पशुधन सांभाळताना येणाऱ्या अडचणींची व्यथा माता-भगिनींनी मांडली. यावेळी आमदार लोणीकर यांनी त्यांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्या आणि पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचा विश्वास दिला. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना निश्चित मदत मिळवून दिली जाईल, तसेच पीक विम्याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित शेतकरी बांधव व माता-भगिनींना दिले. केंद्र सरकारच्या मदतीसाठी काही कालावधी लागू शकतो; मात्र त्याची वाट न पाहता राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. ''हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून निश्चितपणे मदत मिळवून दिली जाईल,'' असा विश्वास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे पीक नुकसान, पाणीटंचाई, पीक विमा आणि शासनाच्या मदतीसंदर्भातील प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाणे, त्यांच्या अडचणी ऐकणे आणि त्यांच्या हक्कासाठी शासनदरबारी आवाज उठवणे ही आपली राजकीय जबाबदारीच नव्हे, तर बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले. ''शेतकरी सुखी, तर महाराष्ट्र सुखी! शेतकरी बांधवांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी माझा संघर्ष अविरत सुरूच राहील,'' असा निर्धार आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

यावेळी नितीन राठोड, विक्रम उफाड, संदीप भैया गोरे पंजाबराव बोराडे माऊली शेजुळ, राजेश मोरे, नागेश घारे आनंद जाधव विलास घोडके गजानन उफाड, जिजाबाई जाधव विकास पालवे मोहन आढे अजय अवचार उद्धवराव घोंडगे विठ्ठलराव कदम मुस्तफा पठाण, गणेश चव्हाल माऊली गोंडगे, नाथराव काकडे डॉ दत्तात्रय काकडे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, रामदास दौंड, तहसीलदार सुमन मोरे श्री गवळी, तालुका कृषी अधिकारी दयानंद वाघमोडे, विष्णू राठोड, एनडी दवने, विठ्ठलमामा काळे शिवाजी जाधव महेश पवार प्रसादराव गडदे रामेश्वर चव्हाण कल्याण चव्हाण बाळासाहेब चव्हाण अनिल पवार सिताराम पवार उत्तम राठोड संदीप पवार प्रताप जाधव अशोक चव्हाण रवी चव्हाण स्वप्निल चव्हाण भारत राठोड श्याम राठोड शंकर पवार सखाराम पवार रुपेश मानकर शिवाजी मानकर पारूबाई पवार कमलबाई पवार शिरूबाई पवार कमलबाई राठोड अनुसयाबाई पवार कुंताबाई पवार बोबलाबाई पवार, हनुमंत उफाड, उपसरपंच संजय सहाने, कैलास उफाड, प्रभाकर उफाड, संदीप पेरके, अंबादास कुरेवाड, जिया चौधरी, गोविंद खरात, नदीम भाई, राजू पवार, अमोल उफाड, नारायण उफाड, सोपान उफाड, जनार्दन सहाने, रमेश सहाणे, जालिंदर राठोड, संदीप राठोड, भगवान गायके, ज्ञानदेव सहाने मुरलीधर कुरेवाड, राहुल उफाड, सुदर्शन सहाने, वैभव सहाने श्याम उफाड, कृष्णा सहान, दशरथ सहाने, सुखदेव सहाने, भगवान सहान, विठ्ठल सांगणे विजय राठोड पांडुरंग काळे सुनील कांगणे सोपान वायाळ सुनील ठाकरे, प्रमोद भालेकर सौरभ माहुरकर सतीश सदावर्ते दिलीप जोशी गणेश मोरे कोमल कुचेरिया एकनाथ जाधव माऊली जाधव राजेश राठोड माऊली पवार श्रीराम राठोड बाबाजी जाधव सचिन राठोड नरेंद्र ताठे मनोज देशमुख तानाजी शेंडगे सतीश खरात रमेश राठोड बंडू नाना खरात दिगंबर अवचार संतोष बोराडे, प्रकाश मोरे रमेश वायाळ, नंदू टकले यांच्यासह महसूल पंचायत कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते शेतकरी माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### लक्कडकोट हत्या...

सायंकाळच्या सुमारास पुन्हा वाद विकोपाला गेल्याचे सांगण्यात येत आहे.

याच वादातून नईमोद्दीन याने रेडियम कट करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कटरने आफरीन यांच्या गळ्यावर आणि हातावर गंभीर वार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात आफरीन यांचा मृत्यू झाला. मात्र, हल्ल्याचे नेमके कारण काय होते, याबाबत पोलिस तपासातूनच अधिकृत माहिती समोर येणार आहे. दरम्यान, पोलिसांनी पती नईमोद्दीन काझी याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, पत्नीच्या चारित्र्यावर संशय असल्याने आपण हे कृत्य केल्याचे त्याने पोलिसांना सांगितल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, प्रॉपर्टी विक्रीच्या टोकन रकमेवरून झालेला वाद, चारित्र्यावरील संशय की यामागे आणखी काही कारण होते, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

दरम्यान, हत्येच्या कारणाबाबत परिसरात वेगवेगळ्या चर्चा आणि तर्कवितर्क सुरू आहेत. मात्र, या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. प्रॉपर्टी व्यवहारातील पैशांचा वाद, पत्नीच्या चारित्र्यावरील संशय आणि प्रत्यक्ष हत्येमागील कारण यातील नेमका संबंध काय आहे, हे पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

### श्रीमद भागवत...

गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाला प्रत्यक्ष प्रारंभ झाला. महाराज पुढे म्हणाले की, श्रीकृष्ण भगवद्गीतेत आणि भागवतात सांगतात की आत्मा अमर आहे; केवळ वस्त्र बदलावे तसा हा देह बदलतो. ही जाणीव कथेच्या श्रवणाने दृढ होते. संसारातील नश्वर गोष्टींविषयीची आसक्ती सुटल्याशिवाय मनाला खरी शांतता लाभत नाही. भागवत कथा भक्ताला ईश्वराच्या चरणी लीन होऊन भयरहित जीवन जगण्याची प्रेरणा देते. कलियुगात कठीण तपश्चर्या किंवा मोठे यज्ञ करणे प्रत्येकाला शक्य नाही; मात्र संतांच्या वाणीतून नामस्मरण आणि भागवत श्रवण केल्यास चित्त शुद्ध होऊन जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळते. शेवटी मुख्य यजमान, दैनिक यजमान आणि आजचे आरती यजमान अभय कुलकर्णी, अजित मानधना, अनिल पंच, अंजली नागोरी, अरुण मोहता, अर्जुन गेही, दीपक जयस्वाल, दुर्गाप्रसाद लड्डा, बंकटलाल खंडेलवाल, लक्ष्मीनारायण खंडेलवाल, लक्ष्मीनारायण मानधना यांच्या हस्ते आरती करण्यात आली. कथेपूर्वी मंगलमय वाद्याचा गजर, भक्तिगीतांचे सूर, भगव्या पताका आणि 'जय श्रीकृष्ण'च्या जयघोषात मुख्य प्रवेशद्वार ते कथास्थळापर्यंत काढण्यात आलेल्या शोभायात्रेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. पारंपरिक वेशभूषेतील महिलांची उपस्थिती, भक्तिगीतांचा निनाद, भगव्या पताका आणि उत्स्फूर्त जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. शोभायात्रेतील भाविकांचा उत्साह आणि धार्मिक वातावरणाने जालन्यातील वातावरण भारावून गेले आहे. २६ सप्टेंबरपर्यंत दररोज दुपारी २ ते ६ या वेळेत चालणाऱ्या या सात दिवसीय भागवत कथा श्रावणाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

### व्यसनमुक्त युवा...

विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. युवकांनी स्वतः व्यसनमुक्त राहण्यासोबतच आपल्या कुटुंबात आणि समाजातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे त्यांनी सांगितले. यानंतर बी. एस. सय्यद यांनी विविध प्रकारच्या व्यसनांमुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक नुकसान तसेच व्यसनाधीन व्यक्तींना उपलब्ध असलेले उपचार व पुनर्वसनाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही व्यसनमुक्तीविषयी माहिती जाणून घेत कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड तसेच महाविद्यालयातील शिक्षक आशिष खंदारे, नोहा कांबळे आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. युवकांनी व्यसनमुक्तीचा संकल्प करून समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा, असा संदेश देणाऱ्या पुस्तिकांचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

### आ. बबनराव लोणीकर...

माध्यमातून नागरिकांना मोकळी आणि हिरवाईने नटलेली जागा उपलब्ध होणार असून, सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी तसेच कुटुंबासह वेळ घालवण्यासाठी चांगली सुविधा निर्माण होणार आहे. परतूर शहरातील रस्ते, नागरी सुविधा आणि सौंदर्यीकरणाच्या कामांना गती देत शहराला नियोजनबद्ध विकासाच्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न सुरू असून, आगामी काळातही विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू राहणार असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले. पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, परतूर शहरातील गाव भागाचा विकास केला जात नाही अशा प्रकारची ओरड विरोधकांनी या आधी केली होती मात्र परतुर शहराचा समतोल विकास करणे ही आमची जबाबदारी असल्याचे सांगत येणाऱ्या काळामध्ये शहरातील सर्व भागांमध्ये विकास कामे दिसतील असेही यावेळी त्यांनी सांगितले यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, नगराध्यक्ष प्रियंका ताई राक्षे भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, संदीप बाहेकर शहाजी राक्षे नगरसेवक विनायक काळे , विजय नाना राखे, प्रकाश चव्हाण, अखिल काजी, सोनू अग्रवाल, सावता काळे कदीर कुरेशी, सतीश सोनवणे, सज्जाद भाई, इजरान कुरेशी, तोफिक भाई रज्जाक कुरेशी , संजय राऊत, ऋषिकेश कार्हाळे संतोष चव्हाण संभाजी घनवट अर्जुन जगताप आकाश राक्षे, दीपक पुरी, नितीन खरात लक्ष्मीकांत राऊत, विजय यादव, बंडू मानवतकर अमोल संजय देशमाने रमाकांत बरिदे, रमेश राऊत संदिपान माने प्रकाश कर्डिले विष्णू तरासे राजू राऊत शिवम कांगणे बंडू मानवतकर मुज्जू कायमखानी मलिक कुरेशी शहानवाज कुरेशी रंगनाथ काळे सोना मामा काळे अरुणराव मगर अहमद हाजी साहब मारुती पाटोळे दवणे अण्णा श्री घाटे, आबासाहेब अंभोरे नितीन भोसले नितीन यादव दिलीपराव मस्के रामेश्वर गांजे श्याम अंभोरे दत्ता दौंड यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

### विघ्नहर्ता गणेश...

भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. आजच्या काळात उत्सवांमध्ये होणारा अनावश्यक खर्च टाळून त्यातील काही भाग सामाजिक कार्यासाठी वापरल्यास समाजातील गरजू घटकांना मोठा आधार मिळू शकतो. विघ्नहर्ता गणेश मंडळाने राबविलेला हा उपक्रम त्याच सामाजिक जाणिवेचे उदाहरण ठरला. 'गणरायाची भक्ती आणि समाजसेवेची शक्ती' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे दिव्यांग व अनाथ बालकांना केवळ मदतच मिळाली नाही, तर त्यांच्या शिक्षणाला आणि भविष्यातील वाटचालीला प्रोत्साहन मिळाले.

# बॉम्बे आर्ट सोसायटीला बळ देण्यासाठी व अनियमततेच्या विरोधात ‘संकल्प पॅनेल’




बॉम्बे आर्ट सोसायटी या १८८८ साली स्थापन झालेल्या कला संस्थेच्या नवीन कार्यकारिणीसाठी दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी निवडणुक होत आहे. बॉम्बे आर्ट सोसायटीला बळ देण्यासाठी व अनियमततेच्या विरोधात एकत्र येत अनेक सभासदांच्या मागणीनंतर ‘‘संकल्प पॅनेल‘‘ २६ कलमी वचनबध्द कार्यक्रम जाहीर करीत निवडणुकीसाठी उतरले आहे. विद्यमान पदाधिकारी सुमारे १५ वर्षापासून कार्यरत आहेत मात्र गेल्या काही वर्षांपासून या संस्थेने, अनेक स्थित्यंतरे, अडी-अडचणी, चढ-उतार आणि बरेच कांही कटु सत्य अनुभवलेले आहेत. प्रस्थापितांना विरोध करण्यासाठी आणि प्रत्येक सजग कलाकाराच्या कला प्रज्ञेला उर्जा देण्याच्या इराद्याने प्रामाणिक, पारदर्शक विचारांचे संस्कार असलेल्या आजीव सदस्यांनी, संस्थेचे ‘‘पुनरुज्जीवन‘‘ करण्याचा संकल्प यावेळी केलेला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठी कला संस्था असलेल्या या संस्थेला पुन्हा उदयास आणून भारतीय संस्कृतीचा ‘‘आयकॉन‘‘ बनवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची जिद्द यातून दिसून येत आहे. २००२ पर्यंत ही संस्था जहांगीर आर्ट गॅलरीच्या एका छोट्याशा खोलीत बंदिस्त होती. आता अध्यक्ष पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या विजय राऊत यांच्या नेतृत्वाखालील त्यावेळी नविन दमाच्या पॅनेलला यश मिळाल्यानंतर २०१० पर्यंत या पॅनलमधील लोकांनी या संस्थेचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला होता. म्हाडाने काढून घेतलेला प्लॉट परत आणण्यापासुन ते बांद्रा येथील कलासंकुलाचे काम, लाइफ टाईम ॲवॉर्डसह इतरही महत्त्वाच्या ॲवॉर्डसची संख्या वाढवून सोसायटीच्या वार्षिक कला प्रदर्शनाच्या समारंभाच्या वेळी प्रदान करण्यास सुरुवात केली होती. हौशी आणि युवा कलावंतांसाठी नियमित, दर्जेदार कला-प्रकाशने व डिजिटल पोर्टफोलिओ प्रकाशन, कला सर्वसामान्यांपर्यंत नेण्यासाठी इतर शहरात कला-उत्सव आणि शिबिरांचे आयोजन, साहित्य संमेलनाच्या धर्तीवर देश-विदेशात वार्षिक भव्य कला संमेलन आणि परिसंवादाचे आयोजन, कला शिक्षण पद्धतीतील बदलांबाबत सरकार दरबारी पाठपुरावा आणि जागरूकता यासाठी शिक्षण सुधारणा, महिला कलावंतांसाठी स्वतंत्र विशेष प्रदर्शन आणि हक्काचे व्यासपीठ, ज्ञान-संवाद होण्यासाठी ज्येष्ठ आणि विशेष कलावंतांची प्रात्यक्षिके आणि विचारवंतांची व्याख्याने, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाण होण्याच्या दृष्टीकोनातून देश-विदेशातील आर्ट गॅलरीजसोबत टाय-अप आणि कलाकार निवासी () कार्यक्रम ट्रस्टचा सर्व निधी योग्य व विहित मार्गाने जास्तीत जास्त वाढवून त्याचा कला व कलाकारांच्या हितासाठी वापर, सर्व सभासदांनचे पाच वर्षातून एखादे चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येईल, बॉम्बे आर्ट सोसायटी आर्ट फेस्टिवल सुरू करण्याची प्रथा निर्माण केली जाईल, संस्थेचे अद्ययावत ग्रंथालय, कला संग्रहालय, आणि प्रतिथयश कलाकारांसह दुर्मिळ कलाकृतींच्या लिलावाचे काही सेवा-शर्ती-नियम-अटींच्या अधीन राहूनआयोजन करणे असा सकारात्मक आणि महत्त्वाकांक्षी उपक्रमांचा प्राधान्याने विचार करीत २६ कलमी कार्यक्रम जाहीर करीत प्रा. विजय राऊत (अध्यक्ष)-अमरावती, डॉ. गजानन सिताराम शेपाळ (सचिव) प. महाराष्ट्र यांनी ‘‘अनियमिततेला नियमित करून कायद्याच्या चौकटीत बद्ध करण्यासाठी १३८ वर्षांच्या सार्वजनिक न्यास असलेल्या बॉम्बे आर्ट सोसायटी या कलासंस्थेला बळ देण्यासाठी आणि नवसंजीवनी बहाल करण्यासाठी नवनिर्मितीचा संकल्प जाहीरनामा घेऊन ‘‘संकल्प पॅनेल‘‘ कला आणि कलवंतासाठी ठोस कृती कार्यक्रम घेऊन पुढे आली आहे. आवाहन केले आहे.

# अभिनयाचा सहजसुंदर प्रवास! ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाच्या जोरावर स्वतंत्र ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मानांपैकी एक असलेला हा पुरस्कार त्यांच्या पाच दशकांहून अधिक काळाच्या समृद्ध कलाप्रवासाचा गौरव करणारा आहे. कन्नड चित्रपटसृष्टीसह हिंदी आणि अन्य भारतीय भाषांमधील चित्रपटांत आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणाऱ्या अनंत नाग यांच्या कारकिर्दीचा हा महत्त्वपूर्ण सन्मान आहे. १६ सप्टेंबर २०२६ रोजी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, २२ सप्टेंबर रोजी गुजरातमधील केवडिया येथे होणाऱ्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

चित्रपटसृष्टीत लोकप्रियता मिळविण्यासाठी केवळ देखणे व्यक्तिमत्त्व, संवादफेक किंवा नायकाची प्रतिमा पुरेशी नसते. अभिनयातील सहजता, व्यक्तिरेखेचा सखोल अभ्यास, भावभावनांची अचूक अभिव्यक्ती आणि भूमिकेशी एकरूप होण्याची क्षमता या गुणांच्या बळावर एखादा कलाकार प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतो. अनंत नाग हे अशाच गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध असलेले अभिनेते आहेत. त्यांनी साकारलेल्या विविध भूमिका केवळ मनोरंजन करणाऱ्या नसून मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडणाऱ्या आहेत. त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकता आणि संयम ही त्यांची खरी ओळख ठरली आहे.

४ सप्टेंबर १९४८ रोजी जन्मलेल्या अनंत नाग यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात कन्नड चित्रपटातून केली. ‘संकल्प’ हा त्यांचा पहिला कन्नड चित्रपट, तर ‘अंकुर’ या हिंदी चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी कन्नड, हिंदी, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि मराठी अशा विविध भाषांतील चित्रपटांमध्ये काम केले. तीनशेहून अधिक चित्रपटांमधील त्यांचा सहभाग त्यांच्या प्रदीर्घ आणि बहुआयामी कारकिर्दीची साक्ष देतो.

अनंत नाग यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःला एका ठरावीक चौकटीत बंदिस्त होऊ दिले नाही. नायक, सहायक अभिनेता, गंभीर स्वभावाची व्यक्तिरेखा, सामान्य माणसाचे जीवन जगणारा मध्यमवर्गीय किंवा विनोदी भूमिकेतील सहज अभिव्यक्ती अशा विविध स्वरूपांत त्यांनी आपली अभिनयक्षमता सिद्ध केली. त्यांच्या अभिनयात कृत्रिमतेपेक्षा वास्तवाला अधिक महत्त्व असते. पडद्यावर ते एखाद्या व्यक्तिरेखेच्या रूपात समोर येतात, तेव्हा प्रेक्षकांना त्या व्यक्तिरेखेत एक परिचित माणूस दिसतो. हीच त्यांच्या अभिनयाची खरी ताकद आहे.

कन्नड चित्रपटसृष्टीत अनंत नाग यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. व्यावसायिक चित्रपट आणि समांतर चित्रपट अशा दोन्ही प्रवाहांत त्यांनी काम केले. चित्रपट केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजातील वास्तव, मानवी नातेसंबंध आणि जीवनातील संघर्ष व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे, याची जाणीव त्यांच्या अनेक भूमिकांमधून होते. त्यांनी विविध दिग्दर्शकांसोबत काम करताना व्यक्तिरेखांच्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक आणि भावनिक विषय प्रेक्षकांसमोर मांडले. त्यांच्या अभिनयाने कन्नड चित्रपटसृष्टीतील कलात्मक चित्रपटांच्या परंपरेलाही समृद्ध केले.

‘मालगुडी डेज’ या लोकप्रिय दूरचित्रवाणी मालिकेतील त्यांचे कामही विशेष उल्लेखनीय आहे. आर. के. नारायण यांच्या साहित्यविश्वावर आधारित या मालिकेने भारतीय प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले. छोट्या शहरातील साधे जीवन, माणसांमधील नातेसंबंध आणि दैनंदिन जगण्यातून उलगडणारे भावविश्व या मालिकेतून प्रेक्षकांसमोर आले. अनंत नाग यांच्या सहज अभिनयामुळे या कथांना अधिक जिवंतपणा प्राप्त झाला. चित्रपटांबरोबरच दूरचित्रवाणीच्या माध्यमातूनही त्यांनी प्रेक्षकांच्या अनेक पिढ्यांशी नाते जोडले.

कलाकाराच्या यशाचे मोजमाप केवळ त्याने मिळविलेल्या पुरस्कारांवरून करता येत नाही. त्याने आपल्या कलेतून किती काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविले, किती विविध भूमिका साकारल्या आणि पुढील पिढीतील कलाकारांना किती प्रेरणा दिली, यालाही महत्त्व असते. अनंत नाग यांच्या कारकिर्दीत या सर्व बाबींचा सुंदर संगम दिसतो. त्यांच्या अभिनयाचा प्रवास हा एका कलाकाराच्या वैयक्तिक यशाचा प्रवास नसून भारतीय चित्रपटसृष्टीतील बदलत्या प्रवाहांचा आणि कलात्मक समृद्धीचा प्रवास आहे.

अनंत नाग यांच्या कलागुणांना यापूर्वीही विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांना पाच फिल्मफेअर पुरस्कार, पाच कर्नाटक राज्य सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार आणि कर्नाटक राज्याचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला आहे. २०२५ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. आता दादासाहेब फाळके पुरस्काराच्या रूपाने त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेला राष्ट्रीय स्तरावर आणखी एक महत्त्वपूर्ण मान्यता मिळत आहे.

दादासाहेब फाळके पुरस्काराचे महत्त्व केवळ त्याच्या प्रतिष्ठेमध्ये नाही, तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या उभारणीत आणि विकासात योगदान देणाऱ्या कलाकारांच्या कार्याची दखल घेण्यात आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार चित्रपट क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानाचा गौरव करतो. चित्रपट निर्मितीच्या विविध अंगांमधून भारतीय सिनेमाला समृद्ध करणाऱ्या कलावंतांसाठी हा पुरस्कार प्रेरणादायी मानला जातो.

अनंत नाग यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने कन्नड चित्रपटसृष्टीसाठीही हा अभिमानाचा क्षण आहे. यापूर्वी ज्येष्ठ अभिनेते डॉ. राजकुमार यांना १९९५ मध्ये हा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर हा सन्मान मिळविणारे अनंत नाग हे कन्नड चित्रपटसृष्टीतील दुसरे अभिनेते ठरले आहेत.

आजच्या चित्रपटसृष्टीत तंत्रज्ञान, भव्य निर्मिती, प्रसिद्धी आणि व्यावसायिक गणितांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, या सर्व बदलांमध्ये अभिनयातील प्रामाणिकपणा, व्यक्तिरेखेचा सखोल अभ्यास आणि कलेप्रती असलेली निष्ठा यांचे महत्त्व कायम आहे. अनंत नाग यांची कारकीर्द हेच अधोरेखित करते. लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचण्यासाठी केवळ मोठ्या पडद्यावरील भव्य उपस्थितीची गरज नसते, तर आपल्या कामातून प्रेक्षकांच्या मनात विश्वास निर्माण करावा लागतो. अनंत नाग यांनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत हा विश्वास संपादन केला आहे.

एकूणच, अनंत नाग यांना जाहीर झालेला दादासाहेब फाळके पुरस्कार हा त्यांच्या प्रदीर्घ कलासाधनेचा, अभिनयातील सहजतेचा आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील अमूल्य योगदानाचा गौरव आहे. त्यांच्या यशातून नवोदित कलाकारांना एक महत्त्वाचा संदेश मिळतोकलेशी प्रामाणिक राहून, सातत्याने मेहनत करून आणि प्रत्येक भूमिकेला न्याय देऊनच कलाकार आपला ठसा काळाच्या पटलावर उमटवू शकतो. अनंत नाग यांचा प्रवास हा अशाच समर्पित कलासाधनेचा प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांच्या या सन्मानामुळे भारतीय चित्रपटसृष्टीतील एका ज्येष्ठ आणि प्रतिभावान कलाकाराच्या कार्याचा गौरव झाला आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# भररस्त्यात महिलेची सोन्याची पोत तोडली; दोन चोरटे दुचाकीवरून पसार

## आयटीआय महाविद्यालयासमोर काही सेकंदांत चोरी; जालना रस्त्याच्या दिशेने पलायन, सीसीटीव्हीच्या आधारे तपास सुरू



**भोकरदन - प्रतिनिधी**

शहरातील जालना रस्त्यावर आयटीआय महाविद्यालयासमोर भररस्त्यात महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत तोडून दोन अज्ञात चोरट्यांनी दुचाकीवरून पलायन केल्याची धक्कादायक घटना घडली.दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकाराने शहरात खळबळ उडाली.जिजाबाई कैलास सहाने (रा.सोयगाव देवी) या जालना रस्त्याने जात असताना दोन अज्ञात व्यक्ती दुचाकीवरून आल्या. त्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याची एकदाणी पोत तोडली आणि क्षणाचाही विलंब न करता जालना रस्त्याच्या दिशेने वेगाने पसार झाल्याचे सांगण्यात आले.घटनेनंतर नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला असून,परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा माग काढला जात आहे.चोरीला गेलेल्या पोतीची किंमत व चोरट्यांची ओळख याबाबत तपास सुरू आहे. वर्दळीच्या रस्त्यावर घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून,पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

# मराठा आरक्षणावर ट्रोलिंग नको; गॅझेटमधील ‘मराठा’ नोंदीचा कायदेशीर मार्ग स्पष्ट करा!

प्रत्येक अंधभक्त आणि त्याच्या रिमोट कंट्रोलर यांनी आपण काय मूर्खपणा करतोय हे जिवंतपने समजून घेण्यासाठी सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती स्वाती चतुर्वेदी यांचे
I am A troll one of all time best selling book हे वाचलेच पाहिजे!
Troll आणि trolling माझी भूमिका माझ्या एका नजीकच्या सदहृदयी स्नेह्यांने माझ्या प्रेमापोटी त्यांच्या सदभावना व्यक्त केल्यानंतर मी इतरत्र दिलेले उत्तर काही बदल करून येथे देत आहे!
आपल्या भावना आणि उद्देश मी समजतो! त्यास्तव मनःपूर्वक धन्यवाद!परंतु समाजहितासाठी काही बाबी यात नमूद करतो.!
१) दिनांक सप्टेंबर २०२५ च्या हैदराबाद गॅझेट मध्ये नेमकी काय दुरुस्ती व्हायला हवी आणि त्यात नमूद १९२१ व १९३१ च्या हैदराबाद गॅझेट मध्ये cultivators गटात सुस्पष्टपणे नोंदवलेली मराठा ही जात (कुणबी शिवाय) त्याच गटात वैध मान्यता द्यावी म्हणून योग्य ते आदेश व्हावेत/असा आदेश द्यावा यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालयात मी यापूर्वीच (ॲड ससाणे यांनी दाखल केलेल्या विरोधातील याचिकेत ) petitioner in person हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे! आणि अशा योग्य दुरुस्ती शिवाय मराठवाड्यातील मराठा आरक्षण प्रश्न /आणि आंदोलने करण्याचा मूळ उद्देश सकारात्मक मिटत नाही! मिटणार नाही! कारण आरक्षणात आधी विशिष्ट जात/जातीला मागास म्हणून मान्यता मिळते आणि नंतर त्या जातीचा व्यक्ती आपोआप वैध आरक्षण पात्र होऊन cast validity and verification प्रक्रियेत त्याला कायदेशीर अडचण येत नाही! आता तुमच्या भरकटलेल्या चळवळीला हे कळत नाही/किंवा वारंवार सांगूनही हैदराबाद गॅझेट मधील ओबीसी गटातील मराठा जाती साठी ठोस भूमिका घ्यायची इच्छा नाही हे स्पष्ट दिसून येत आहे म्हणूनच/ तर मला मराठा म्हणून माझी भूमिका घ्यावी लागेलच् ना? ती मी घेतली आहे. ज्या आमच्या भावंडाकडे वैध कुणबी वंशावळी पुरावे आहेत त्यांना न्या. संदीप शिंदे समितीने कुणबी प्रमाणपत्र साठी वैध/कायदेशीर मार्ग सताड उघडा / मोकळा केलाय ती खिडकी उघडून दिली आहे आणि त्या साठी आपण सर्वांनी सातत्याने आंदोलन केले होतेच आणि हा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे! हे नेमके सत्य आताच का पचनी पडू नये? ते स्वतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अठरा पगड जाती जमातीला एकत्र बांधून पुढे चालण्याच्या वैचारिक विचाराचे वारसा जोपासणारे सच्चे मराठाच आहेत ना? मग त्यांना विरोध का?
कोपर्डीच्या भगिनीवर झालेला दुर्दैवी अत्याचारानंतर साधारण २०१६ पासून मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्र च्या माध्यमातून जालना शहरात आयोजित १२/१३ लाख सकळ मराठा समाज बांधव आया बहिणींचा विराट मूक मोर्चा असो की २०२४/२५ श्री. मनोज जरांगे पाटील यांची जालना शहरातील महा रॅली व प्रचंड मोठी सभा यात माझा सक्रिय खारीचा वाटा आहेच हे माझा ठार वेडा विरोधक ही अमान्य करणार नाही आणि नेमका तो अनुल्लेखाने तुमच्या कडून विसरला आहे! हरकत नाही.... आंतरवाली येथील लाठीमार गोळीबारा नंतर जालना जिल्हा बंद ठेवणे/ धांदरलेल्या / अंतरवळीच्या सरपंचासह प्रमुख ग्रामस्थांची तत्कालीन जिल्हाधिकारी श्री पांचाळ साहेब आणि यांच्या बरोबर जिल्हाधिकारी कार्यालयात हॉल मध्ये बैठक लावून प्रशासन आणि मराठा समाज यात सामंजस्य निर्माण करणारा मीच आहे! कुणीही पुढारी आला नव्हता आपणच होतो!
तब्बल १ महिना छत्रपती संभाजी महाराज पुतळा ठिय्या आंदोलनात/आणि छोटी मोठी सामाजिक आंदोलन /पेंडोल / सतरंज्या/ बॅनर/ होर्डिंग्ज यात भार वाहक करणारा मीही होतो/आहे /राहील. ना. एकनाथराव शिंदे यांच्यावर जहरी वैयक्तिक, राजकीय घाणेरडी टिका वारंवार करून तुमच्या नेत्याने सामाजिक आंदोलक ही लक्ष्मण रेषा ओलांडली आहे/ कोलांट्या उड्या मारून पार केली आहे आणि कुणाची तरी राजकीय भूमिकेचा वाहक म्हणून या टप्प्यात निभावत आहेत हे स्पष्ट दिसून येत आहे आणि त्यांनी ते करू नये; आंदोलन सामाजिक व हैदराबाद संस्थान मधील मराठ्यांना न्याय मिळवण्यासाठीच असावे भरकटू नये हीच आमची माफक अपेक्षा कारण सध्या मराठा समाजाला जे दिले आहे ते ना एकनाथराव शिंदे यांनीच दिले आहे हे आपण सगळे जाणतो आणि मराठा म्हणून आणि शिवसेना पक्ष कार्यकर्ता म्हणून मला/आपणाला याचा अभिमान असला पाहिजे म्हणूनच_ त्यांचे श्रेय नाकारून त्यांनाच बदनाम करण्याच्या राजकीय षड्यंत्राला एक मराठा आणि शिवसैनिक म्हणून माझा विरोध आहे! राहील.

आता विषय ट्रोल चा तर ट्रोल म्हणजे अंधभक्त आणि हे अंधभक्त ज्या दिवशी सुजाण सुशिक्षित विचारी स्वहित कळणारे होतील तो मराठा समाजासाठी सुदिन असेल... यापुर्वी कधीही कुठल्याही सामाजिक आंदोलनात असे ट्रोल किंवा ट्रोलपालक नव्हते किंवा इतर जाती जमातींचा उद्धार केला जात नव्हता तर भुमिका समजून उमजून पाठींबा दिला जात असे किंवा शांत बसत... म्हणून एकतर मलाएकही स्वतःचा अंधभक्त नकोच आहे... ज्यांना आहेत; ज्यांनी पाळीव /पार्ले जी पुड्यावर पाळलेले आहेत तर ते त्यांनाच् लखलाभ ... आणि त्यांच्या साठीच I AM A TROLL हे पुस्तक वाचण्यासाठी सप्रेम भेट! पण या तमाम ट्रोल आणि त्यांचे रिमोट कंट्रोल धारक यांना एकच विनंती मला ट्रोल करणे म्हणजे माझ्या सत्य भुमिकेला / हैदराबाद संस्थान मधील मराठा जातीला आरक्षण देण्यासाठीच्या भूमिकेला आणि या cultivators गटातील पात्र मराठ्यांना आरक्षण पात्र करण्यापासून तुम्ही का पळ काढत आहेत? या माझ्या भूमिकेला आणि प्रश्नाला विरोध करणे आहे हे मुळात समजून घ्या! आणिते मान्य असेल? हैद्राबाद संस्थान मधील मराठा जात आरक्षणात घालायचीच् नसेल? आणि बनवाबनवी चालूच ठेवायची असेल तर मात्र बिनदिक्कत विरोध करा! हे माझे आवाहन आहे!आणि त्यासाठी सध्याच्या टप्प्यात तुमचे आंदोलन चालू आहे हे मला तरी डोळसपणे दिसत आहे! आणि त्यापाठीमागील राजकीय सारीपाट काय आहे ते राजकारण मी जाणतो! मला बोलायला लावले तर दिगंबर व्हाल.

हैदराबाद संस्थान मधील मराठ्यांना ओबीसी आरक्षण केवळ ना. एकनाथराव शिंदे हेच देऊ शकतात ती प्रचंड राजकीय इच्छाशक्ती फक्त आणि फक्त ना. एकनाथराव शिंदे - यांच्या कडेच आहे हे तमाम महाराष्ट्र ओळखून आहे! आणि होय म्हणूनच् त्यांना विरोध करणे, त्यांना सामाजिक ,राजकीय व नाहक बदनाम करणे हे आरेक्षणेच्छू मराठा जातीच्या हिताचे नाही हे लक्षात असू द्या...म्हणून मी स्वतः शिंदे साहेब यांच्या इतर कुणालाही न दुखावता मराठा समाजाला न्याय् या त्यांच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सामाजिक न्यायाच्या वैचारिक/ राजकीय/ प्रशासनिक /कायदेशीर भूमिके बरोबर ठामपणे उभा
आहे हे नक्की
.... ना की मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेट... म्हणत मराठ्यांना फसवणाऱ्या मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितेचे अध्यक्ष ना. विखे पाटील यांच्या...म्हणून माझी भूमिका निश्चितच या तथाकथित ट्रोल आणि त्याचे तथाकथित शिखंडी रिमोट कंट्रोल धारकांच्या विरोधात आहे/ राहिल कदाचित तुम्हाला मी एकटा च् आहे असे वाटले तरीही...कारण
व्यापक सामाजिक राजकीय मराठा समाज हित माझ्या या भुमिकेत आहे ना की या सध्याच्या आंदोलनाच्या टप्प्यातील दृश्यमान भरकटलेल्या दशा आणि दिशेत...

आणि हे जेव्हा मराठा तरूणांना कळेल तेव्हा खुप उशिर झालेला असेल... ७० वर्ष गेलेच आहेत ( न्या संदीप शिंदे समितीच्या माध्यमातून तत्कालीन मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे यांनी दिलेला न्याय वगळता) ...पुढे तर कदाचित सुरुंगातील अंधारच... सुज्ञास अधिक न सांगणे...पुन्हा एकदा सर्वांना धन्यवाद!
आणि हो.

**Million Dollar Question**

सन्माननीय पार्ले जी उत्पादक उर्फ troll पालक माझे आपणाला जाहीर आव्हान आहे तुम्ही खरे मर्द असाल तर दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ चे हैदराबाद गॅझेट, ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी वेळोवेळी आणि काल सुद्धा जाहीर केलेली sop यातून हैदराबाद संस्थान मधील एकतरी जातिवंत मराठ्याला प्रमाणपत्र आणि cast validity and verification मिळवून द्या नसता तुम्ही केवळ शिखंडी troll पालक आहात हे जाहीर मान्य करा!
मराठा समाजाचे किंवा कुठलेही प्रश्न विधायक चर्चेतून सुटतील/ सुटतात ना की शिखंडी अल्सेशियन ट्रॉलिंग गँग बाळगून !

**डॉ. संजय लाखेपाटील**










**गणपती बाप्पा मोरया...**

**जालना शहरातील कादराबाद चा राजा गणेश मित्र मंडळ कादराबाद, श्री जय शंकर गणेश मित्र मंडळ भाजी मंडी जालना जगन्नाथ पुरीचे रूप, विघ्नहर्ता गणेश मंडळ कोष्टी गल्ली हैदराबादचा देखावा, श्री गुरु गायबिनाथ महाराज प्रतिष्ठान कोष्टी गल्ली काद्राबाद गणेश मंडळाचे गणेश मुर्ती तसेच आरपी रोड (बडी सडक) नवीन जालना येथील गणेश मुर्ती व देखावे पाहण्यासाठी गणेश भक्तांनी मोठी गर्दी केली होती.** ***छायाचित्र किरण खानापुरे***

# गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'लोकसंवाद-२०२६'; शासकीय योजनांची नागरिकांना माहिती

**जालना - प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम तसेच धोरणात्मक निर्णयांची माहिती थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधून



शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, उपक्रम आणि विभागीय कार्यक्रमांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा आहे. त्याच अनुषंगाने आज दि. २० सप्टेंबर रोजी बदनापूर तालुक्यातील फुलेनगर येथील भोलेश्वर युवा प्रतिष्ठान गणेश मंडळाच्या ठिकाणी 'लोकसंवाद-२०२६' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आरोग्य, कृषी तसेच महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजना व उपक्रमांची नागरिकांना माहिती देण्यात आली. आरोग्य विभागाच्या विविध योजना, नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या आरोग्यविषयक सुविधा आणि शासनाच्या आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी डी. एस. बोराडे यांनी दिली.

तसेच महिला व बाल विकास विभागाचे अंमलबजावणी सहाय्यक अधिकारी बी. बी. राठोड यांनी महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती उपस्थित नागरिकांना दिली. यावेळी नागरिकांनी विविध योजनांबाबत प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली. संबंधित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन करून योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती दिली. गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासन आणि नागरिक यांच्यात थेट संवादाचे व्यासपीठ उपलब्ध झाल्याने या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शासनाच्या योजना आणि उपक्रमांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांच्या अडचणी व शंकांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे यावेळी दिसून आले. कार्यक्रमास भोलेश्वर युवा प्रतिष्ठान गणेश मंडळाचे अध्यक्ष परमेश्वर सुधाकर खैरे यांच्यासह गणेश मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या सहभागामुळे कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



जुना जालना भागातील गांधीचमन येथे चमनचा राजा या गणपतीचा खाटू शाम चा देखावा करण्यात आला आहे छायाचित्र किरण खानापुरे

## सटवाई तांड्याला दिलासा;ऑल इंडिया बंजारा सेवा संघ चे जिल्हाध्यक्ष चेतन भाऊ राठोड यांच्या वतीने बाळू जाधव यांचा गौरव

**जालना - प्रतिनिधी**

सटवाई तांडा येथील नागरिकांच्या जागा नियमित करून त्यांना घरकुलाचा लाभ मिळवून देण्याच्या मागणीसाठी मनसे शहर उपाध्यक्ष बाळू जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, सटवाई तांडा येथील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सटवाई तांडा येथे मागील अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या जागा नियमित करून त्यांना शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ मिळावा, यासाठी बाळू जाधव यांनी प्रशासनाकडे



निवेदन सादर केले होते. या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर प्रशासनाच्या माध्यमातून सकारात्मक कार्यवाही झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या निवेदनाच्या माध्यमातून नागरिकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष चेतन भाऊ राठोड यांच्या वतीने बाळू जाधव यांचा सत्कार करून स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी मंगेश राठोड,जयपाल राठोड पंचमसिंग, कृष्णा भालेराव यांच्यासह सत्कार करण्यात आले.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# परतूरमध्ये 'लायन्स क्वेस्ट'च्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात नवा अध्याय

## चार शाळांतील २५ शिक्षकांना प्रशिक्षण; एक हजार विद्यार्थ्यांना सामाजिक व भावनिक विकासाचे शिक्षण

**परतूर – प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार, आत्मविश्वास, जबाबदार निर्णयक्षमता, नेतृत्वगुण तसेच सामाजिक व भावनिक कौशल्ये विकसित करण्यासाठी दृष्टी फाउंडेशन व लायन्स क्लब ऑफ परतूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १२ व १३ सप्टेंबर २०२६ रोजी दृष्टी लायन्स नेत्रालय येथे दोन दिवसीय ''लायन्स क्वेस्ट शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा'' उत्साहात संपन्न झाली. लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन अवसेकरजी यांच्या प्रेरणादायी संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली हा महत्त्वाकांक्षी शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. कार्यशाळेचे






उद्घाटन प्रथम उपप्रांतपाल लायन योगेशजी जयस्वाल यांच्या हस्ते झाले, तर समारोप माजी प्रांतपाल लायन अरविंद माछर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

अनुभवी प्रशिक्षिका मनीषा घाटी मॅडम यांनी लायन्स क्वेस्टची संकल्पना, अभ्यासक्रम, आधुनिक अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्याची प्रभावी अंमलबजावणी याबाबत शिक्षकांना प्रशिक्षण दिले. विविध कृती, प्रात्यक्षिके आणि गटचर्चांच्या माध्यमातून दिलेल्या त्यांच्या संवादात्मक प्रशिक्षणाला शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेच्या नियोजनापासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत डिस्ट्रिक्टचे लायन्स क्वेस्ट ॲम्बेसेडर लायन अशोकजी पांचाळ यांनी विशेष वेळ देऊन सातत्यपूर्ण मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य केले. परतूरमधील अधिकाधिक शाळा आणि विद्यार्थ्यांना या उपक्रमाशी जोडण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

या कार्यशाळेत न्यू वंडर स्कूल, ज्ञानलता पब्लिक स्कूल, आनंद इंग्लिश स्कूल आणि आनंद विद्यालय व माध्यमिक विद्यालय या चार शाळांमधील २५ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. या शाळांमधील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी लायन्स क्वेस्ट उपक्रमासाठी नोंदणी केली असून, प्रशिक्षित शिक्षकांच्या माध्यमातून प्रत्येक वर्गासाठी आठवड्यातून एक नियमित तासिका घेतली जाणार आहे.

लायन्स क्वेस्ट हा लायन्स इंटरनॅशनलचा जागतिक स्तरावरील शैक्षणिक उपक्रम आहे. यामधून विद्यार्थ्यांना अर्थात सामाजिक व भावनिक विकासाचे शिक्षण दिले जाणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.